* मुख्य संपादक *
सुग्रीव सोपानराव मुंडे
* आवृत्ती संपादक *
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
# आत्ताच एक्सप्रेस
* नांदेड * परभणी * हिंगोली

E-Paper :
www. attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

* वर्ष १० वे * अंक ३०१ * किंमत - २ रु | RNI.No. MAH/MAR2014/56289 | * शनिवार दि.०७ मार्च २०२६ | * पाने-४


# अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना दिलासा, मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून कर्जमाफीची घोषणा

## ७.६९ लाख कोटींचा विकासाभिमुख अर्थसंकल्प सादर



**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** राज्याच्या सर्वांगीण, सर्वसमावेशक आणि दीर्घकालीन विकासाला गती देण्याच्या उद्देशाने सादर करण्यात आलेला २०२६–२७ वर्षाचा ७.६९ लाख कोटींचा अर्थसंकल्प 'विकसित महाराष्ट्र' या ध्येयावर आधारित असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. प्रगतीशील विकास, शाश्वतता, सर्वसमावेशकता आणि सुशासन या चार स्तंभांवर आधारित हा अर्थसंकल्प राज्याच्या आर्थिक, सामाजिक आणि पायाभूत विकासाला नवी दिशा देणारा ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी करीत शेतकऱ्यांना दिलासा देणारा कर्जमाफीचा निर्णय जाहीर केला.

विधानसभेत राज्याचा अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळ सदस्य, विधानसभा सदस्य उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याची अर्थव्यवस्था पुढील काही वर्षांत एक ट्रिलियन डॉलरच्या टप्प्यावर पोहोचवण्याचे लक्ष्य असल्याचे सांगितले. या उद्दिष्टासाठी पायाभूत सुविधा, उद्योग, शेती, शिक्षण आणि डिजिटल तंत्रज्ञान या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' जाहीर करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीककर्ज थकित असलेल्या पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात येणार आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर लाभ देण्यासोबतच बँकिंग यंत्रणा सक्षम करण्यासाठी, तसेच शेतकऱ्यांना कायमस्वरुपी कर्जमुक्त करण्यासाठी समितीच्या शिफारसींनुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. शेतीमालाला जागतिक बाजारपेठ देण्यासाठी १० ते १५ पिकांची एकात्मिक मूल्यसाखळी निर्माण करण्यात येईल. जानेवारी २०२६ पर्यंत १ कोटी ३१ लाख फार्मर्स आयडी तयार करण्यात आले आहेत. आता त्यात आदिवासी वनपट्टेधारक शेतकरी समाविष्ट करणार असून कृषी समृद्धी योजनेंतर्गत २०२६–२७ पासून ४ वर्षांत भांडवली गुंतवणूक वाढवणार आहे. तसेच नवीन प्राकृतिक शेती अभियानात ५ लाख हेक्टर क्षेत्र प्राकृतिक शेतीखाली आणण्यात येईल.

महात्मा ज्योतिबा फुले यांची २०० वी जयंती ११ एप्रिल २०२६ यावर्षी आहे. त्यासाठी एक समिती स्थापन करुन विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात येईल, त्यासाठी निधी देणार असून महात्मा फुले यांचे जन्मगाव मौजे कटगुण, जिल्हा सातारा येथे भव्य स्मारक उभारणार आहे. तसेच ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगाव, जिल्हा सातारा येथे स्मारक आणि महिला प्रशिक्षण केंद्र आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महाड, चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त पायाभूत सोयीसुविधांचा विकास आराखडा तयार करणार आहे. त्याचप्रमाणे संत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीवर्षानिमित्त त्यांचे जन्मस्थळ, कर्मभूमी, अंतिम श्रद्धास्थान यांना एकत्रित करुन संत गाडगेबाबा तीर्थक्षेत्र सर्किट विकसित करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय अभियाने एकत्र करुन संत गाडगेबाबा ग्राम समृद्धी अभियान राबविण्यात येणार आहे. ७५ गावांत 'एआय'च्या सहाय्याने नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी पथदर्शी प्रकल्प राबविणार असून महात्मा फुले, संत गाडगेबाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींचे विशेष वर्ष म्हणून २०२६–२७ हे 'सामाजिक समता आणि समरसता वर्ष' म्हणून साजरे करणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

जगद्गुरु तुकाराम महाराजांचे देहू येथील घर आणि जन्मस्थानाचे जतन, संवर्धनासाठी आराखडा तयार करण्यात येणार आहे. नवरगाव, रामटेक येथे राज्यातील तिसरी चित्रनगरी विकसित करण्यात येणार आहे. नव्यापिढीला महाकवी कालिदास यांच्या साहित्याची ओळख व्हावी, त्यांचे जीवनचरित्र नव्या पिढ्यांना कळण्यासाठी चित्रपट निर्मिती करणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. रामटेक विकास आराखडा टप्पा–२ ची कामे करणार असून पंढरपूर मंदिर विकास आराखड्यातील पुढील कामे हाती घेणार असून ५ ज्योर्तिलिंग विकासाची कामे सुरु असून महानुभाव पंथीय विविध धार्मिक स्थळांच्या ठिकाणी सुविधांसाठी निधी देणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली म्हणून राज्य शासन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसे स्मारक उभारणार असून अजित पवार यांच्या नावे गतिमान नागरी सेवा पुरस्कार देणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

राज्य आणि जिल्हा योजनांचे एकत्रिकरण करुन पशुधनात स्वयंपूर्णता, रोजगारनिर्मितीवर भर देण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्षानिमित्त गो–पालक, कुक्कुटपालक व शेळीपालक यांच्यासाठी विशेष कार्यक्रम सुरु करणार असून मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेमध्ये प्रतिवर्षी १२४० कोटी रुपये देण्यात येणार आहे,त्याचा २०,५९४ मासेमारांना लाभ मिळेल.

मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना सुरु राहणार असून यासाठी यंदा सुमारे २०,००० कोटींची तरतूद असून फेब्रुवारी २०२६ पर्यंत ३२,७५६ कोटी रुपये दिले आहेत. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मध्ये १६ हजार मे.वॅ. ऊर्जाक्षमता स्थापित करण्याचे उद्दिष्ट असून, यातून १०० टक्के कृषीपंपांना दिवसा वीजपुरवठा तसेच डिसेंबर २०२६ पर्यंत १० हजार मे.वॅ. क्षमता स्थापित होणार आहे. सध्या ३३४९ मे.वॅ. क्षमता स्थापित आहे.तर मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेत आतापर्यंत ६,६३,३२४ सौर कृषीपंप दिले असून सौर कृषीपंप अंमलबजावणीत महाराष्ट्र प्रथम क्रमांकवर असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

शेती क्षेत्र अधिक आधुनिक आणि तंत्रज्ञानाधारित करण्यासाठी ॲग्रीस्टॅक, महावेध, क्रॉपसॅप, महाडीबीटी यांसारख्या डिजिटल प्रणालींच्या माध्यमातून एकात्मिक डिजिटल कृषी व्यवस्था उभारली जाणार आहे. राज्यातील चार कृषी विद्यापीठांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित नवोपक्रम केंद्रे सुरू करण्यात येणार असून त्यामुळे शेती उत्पादन खर्चात लक्षणीय घट होण्याची अपेक्षा आहे.

राज्यातील पाणी व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी मोठ्या नदीजोड प्रकल्पांवर भर देण्यात आला आहे. वैनगंगा–नळगंगा नदीजोड प्रकल्पासाठी ९४,९६८ कोटी रुपये, तर दमणगंगा–वैतरणा–गोदावरी नदीजोड प्रकल्पासाठी १३,४९७ कोटी रुपये खर्च करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रकल्पांमुळे सिंचनक्षमता वाढण्यासोबतच पाणीटंचाई असलेल्या भागांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा आहे. याशिवाय कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील पूरनियंत्रणासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने २,२४० कोटी रुपयांचा प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी भरीव तरतूद करण्यात आल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, एकल महिला धोरण राबवण्यात येणार असून त्यासाठी सर्व जिल्ह्यात एकल महिलांचे सर्वेक्षण सुरु असून, अहवालाचे विश्लेषण करुन धोरण आणण्यात येईल. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राज्य सरकारच्या विविध योजनांनाही अर्थसंकल्पात चालना देण्यात आली आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' सुरू ठेवण्यात येणार असून महिला बचतगटांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी १३ जिल्ह्यांत 'उमेद मॉल' उभारले जाणार आहेत. राज्यात आतापर्यंत ३७ लाख 'लखपती दीदी' तयार झाल्या असून पुढील काळात आणखी २५ लाख महिलांना लखपती बनवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. युवकांना जागतिक दर्जाचे शिक्षण उपलब्ध व्हावे यासाठी नवी मुंबई येथे 'एज्युसिटी' उभारण्याची योजना राबविण्यात येत आहे. या प्रकल्पात विविध आंतरराष्ट्रीय विद्यापीठे सुरू होणार नवी मुंबईत ६ देशांतील विद्यापीठे याचवर्षी सुरु होणार आहेत. याच धर्तीवर ८ ते १० शैक्षणिक शहरे विकसित करणार असून भविष्यात राज्यात ८ ते १० शैक्षणिक शहरे विकसित करण्याचा मानस आहे.

स्टार्टअप आणि नवउद्योजकतेला चालना देण्यासाठी पुढील पाच वर्षांत १.२५ लाख उद्योजक तयार करणे आणि ५० हजार स्टार्टअप उभारणे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची ओढ निर्माण करण्यासाठी मुख्यमंत्री विज्ञान वारी योजनेंतर्गत इस्त्रो आणि अमेरिकेतील नासा या जगप्रसिद्ध संस्थांना भेट देण्याची संधी या योजनेतून मिळेल.

परदेशी नोकऱ्यांसाठी आवश्यक भाषा, कौशल्य प्रशिक्षण, आर्थिक मार्गदर्शन यासाठी 'महिमा' संस्थेतून मार्गदर्शन करण्यात येईल.तसेच समुपदेशन सेवा विस्तार आणि अधिक संघटित व्यवस्थेसाठी ३६ नवदिशा केंद्र स्थापन करण्यात येईल.

पुढील ५ वर्षांत १.२५ लाख उद्योजक घडवणार, ५० हजार स्टार्टअपला बळ देणार असून मुख्यमंत्री उद्योजकता महाफंडमधून स्टार्टअप्सना थेट आर्थिक मदत देण्यात येणार असून , सर्वोत्तम ५० स्टार्टअप्सना नाविन्यपूर्ण प्रकल्प शासनात राबविण्यासाठी २५ लाखांपर्यंतच्या शासकीय कामाचे थेट वर्कऑर्डर्स मिळतील. ॲथलेटिक्स, बॅडमिंटन, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग, हॉकी, कुस्ती, आर्चरी, शूटिंग, रोईंग, सेलिंग, लॉनटेनिस, टेबल टेनिस या १२ खेळांचे राज्य स्तरावर ८ हायपरफॉर्मन्स सेंटर्स सुरु असून आता आणखी ४ केंद्र सुरु करणार असून विभागीय स्तरावर २५ क्रीडा उत्कृष्टता केंद्र आणि जिल्हा स्तरावर ९६ क्रीडा गुणवत्ता विकास केंद्र सुरु करणार आहोत, यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

सामाजिक न्यायाच्या योजनांसाठी मोठी तरतूद करण्यात आली असून अनुसूचित जातींसाठी २३,१५० कोटी रुपये, तर आदिवासी घटकांसाठी २१,७२३ कोटी रुपये निधी देण्यात आला आहे.

# महिला सक्षमीकरण, आरोग्य सुविधा व पायाभूत विकासाला चालना–पालकमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर

**आत्ताच एक्सप्रेस**

**परभणी –** राज्याच्या सन २०२६–२७ च्या अर्थसंकल्पात महिला सक्षमीकरण, सार्वजनिक आरोग्य सुविधा, स्वच्छ ऊर्जा तसेच पायाभूत सुविधांच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्या असून या निर्णयांमुळे राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल, अशी प्रतिक्रिया सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास तसेच सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) विभागाच्या राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर यांनी दिली.

महिला व बालविकास विभागांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी भरीव तरतूद करण्यात आली असून अंगणवाडी सेविकांना आर्थिक नियोजनाचे प्रशिक्षण देऊन लाभार्थ्यांना आर्थिक साक्षरतेबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. राज्यात एकल महिला धोरण तयार करण्यासाठी सर्व जिल्ह्यांत सर्वेक्षण सुरू असून त्याच्या आधारे धोरण जाहीर केले जाईल. 'लखपती दिदी' अभियानांतर्गत राज्यात २७ लाख महिला लखपती झाल्या असून २०२६–२७ मध्ये आणखी २५ लाख महिलांना लखपती करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. महिला बचतगटांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी १३ जिल्ह्यांत 'उमेद मॉल' उभारले जाणार आहेत.

सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात नागपूर येथे उच्च दर्जाच्या प्रशिक्षण व संशोधनासाठी 'महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य संस्था' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कर्करोग, मधुमेह व हृदयविकार यांसारख्या आजारांच्या निदानासाठी ग्रामीण भागात आशियाई विकास बँकेच्या मदतीने ४५०० कोटी रुपयांची प्रगती योजना राबविण्यात येणार आहे. 'महाराष्ट्र डिजिटल आरोग्य तंत्रज्ञान अभियान'द्वारे राज्यात डिजिटल सार्वजनिक आरोग्य परिसंस्था निर्माण करण्यात येणार आहे. महात्मा फुले जनआरोग्य योजनेत उपचारांच्या प्रकारांची संख्या १३५६ वरून २३९९ पर्यंत वाढविण्यात आली असून रुग्णालयांची संख्या १७९२ वरून ४५३७ इतकी करण्यात आली आहे.

ऊर्जा क्षेत्रात सौर, पवन व हरित हायड्रोजन प्रकल्पांना चालना देत स्वच्छ ऊर्जा निर्मितीला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०, मागेल त्याला सौर कृषी पंप आणि प्रधानमंत्री सूर्यघर योजनेसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. पायाभूत सुविधांच्या विकासासाठीही महत्त्वाचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. दक्षिण मुंबईला समृद्धी महामार्गाशी थेट जोडण्यासाठी छेडा नगर ते आनंद नगर आणि आनंद नगर ते साकेत (ठाणे) या उन्नत रस्त्याचे काम डिसेंबर २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. साकेत ते आमणे या उन्नत रस्त्यासाठी प्रकल्प अहवाल तयार केला जात आहे. तसेच १८ हजार १२१ कोटी रुपयांच्या स्वातंत्र्यवीर सावरकर वांद्रे–वर्सोवा सागरी पूल प्रकल्पाचे चारही टप्पे प्रगतीपथावर असून हा प्रकल्प मे २०२८ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.



किनवट पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी किनवटच्या नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांच्या निवासस्थानी भेट दिली असता मा.नगराध्यक्षा व युवानेते करण येंड्रलवार यांनी त्यांचे स्वागत व सत्कार करून शहरातील कायदा सुव्यवस्थेबाबत चर्चाही केली.

# किनवटमध्ये २२ मार्चला सर्वधर्मीय वधू–वर परिचय व विवाह मेळावा

## गरजू, विधवा, घटस्फोटित व दिव्यांगांना नव्या आयुष्याची संधी

*** आत्ताच एक्सप्रेस**
**लक्ष्मीकांत मुंडे**



**किनवट –** समाजातील विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित, दिव्यांग तसेच गरजू वधू–वरांना नव्या आयुष्याची संधी मिळावी या उद्देशाने आधार बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, किनवट यांच्या वतीने सर्वधर्मीय वधू–वर परिचय व विवाह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा दि. २२ मार्च २०२६ रोजी कलावती गार्डन, किनवट येथे आयोजित करण्यात येणार आहे.

समाजातील दुर्बल घटकांना आधार देण्यासाठी हा सामाजिक उपक्रम दरवर्षी आयोजित केला जातो. या मेळाव्यात विधवा, विधुर, परित्यक्ता, घटस्फोटित तसेच दिव्यांग वधू–वरांना सहभागी होऊन योग्य जीवनसाथी निवडण्याची संधी मिळणार आहे.

या मेळाव्यात सहभागी होणाऱ्या वधूंना सोन्याचे मनीमंगळसूत्र, चांदीचे जोडवे देण्यात येणार असून गरीब व विधवा महिलांना साड्या तसेच शिलाई मशीनचे वाटप करण्यात येणार आहे.

मागील वर्षी झालेल्या मेळाव्यात मराठवाडा, विदर्भ, तेलंगणा तसेच इतर राज्यांमधून १०० पेक्षा अधिक वधू–वरांनी सहभाग नोंदवला होता. यावर्षीही मोठ्या संख्येने गरजू वधू–वरांनी सहभागी होऊन या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक प्रा. जयश्री भरणे यांनी केले आहे. या उपक्रमामुळे समाजातील अनेक गरजू कुटुंबांना दिलासा मिळत असून अनेकांचे संसार पुन्हा उभे राहत आहेत. त्यामुळे या मेळाव्याला समाजातील विविध स्तरातून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

# किनवटमध्ये "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभीयान

## नऊ महसुल मंडळांत विशेष, शिबीरे: तक्रारींचा जागेवर निपटारा

*** आत्ताच एक्सप्रेस**
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट –** महसुल विभागाच्या सेवा अधीक पारदर्शक, गतिमान व नागरीकामुख करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभीयान – टप्पा १" राबविण्यात येत आहे. किनवट तालुक्यात या अभीयानांतर्गत नऊ महसुल मंडळामध्ये विशेष समाधान शिबीरांचे आयोजन करण्यात आले असुन नागरिकांच्या प्रलंबित महसुल प्रकरणांचा जागेवर निपटारा करण्यावर भर देण्यात येणार आहे.

शेतकरी, महिला, विदयार्थी, व्यापारी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या विविध तक्रारी व अर्जाची तात्काळ दखल घेऊन मार्गदर्शन व निर्णय देण्यासाठी संबंधीत अधीकारी शिबीरस्थळी उपस्थीत राहणार आहेत. त्यामुळे तहसिल कार्यालयातील वारंवारच्या फे–या टाळुन गावपातळीवरच सेवा उपलब्ध होणार आहे.

या अभियानात किनवट तालुक्यातील, बोधडी बु., सिंदगी (मो), जलधरा, ईस्लापुर, शिवणी, दहेली, उमरी (बा), मांडवी, तसेच किनवट मंडळ येथे नियोजीत तारखांना ही शिबीरे पार पडणार आहेत. प्रत्येक मंडळात स्वतंत्र दिवशी शिबीर भरवुन फ`रफार नोंदी, ७/१२ व ८ अ उतारे, वारस नोंद, अभीलेख दुरुस्ती, उत्पन्न, रहिवाशी, जात व नॉन– क्रीमीलेअर प्रमाणपत्रे, लोकसेवा हक्क कायदयातील सेवा तसेच विविध शासकिय योजनांबाबत मार्गदर्शन आदी सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत. प्रलंबित प्रकरणांना गती देण्यासाठी व नागरीकांना त्वरीत दिलासा मिळावा या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या या अभीयानाचा तालुक्यातील नागरिकांनी मोठया संख्येने लाभघ्यावा, असे आवाहन सहाय्यक जिल्हाधीकारी किनवट जेनित चन्द्रा दोन्तुला (भा.प्र.से.) व तहसिलदार डॉ. शारदा चौंडेकर यांनी केले आहे.



### मंडळाचे नांव व दिनांक

| | |
|---|---|
| १. बोधडी बु. | ७ मार्च २०२६ |
| २. सिंदगी (मो) | १४ मार्च २०२६ |
| ३. जलधरा | १० एप्रिल २०२६ |
| ४. ईस्लापुर | १७ एप्रिल २०२६ |
| ५. शिवणी | २४ एप्रिल २०२६ |
| ६. दहेली | ३० एप्रिल २०२६ |
| ७. उमरी (बा) | १२ मे २०२६ |
| ८. मांडवी | १५ मे २०२६ |
| ९. किनवट | ८ मे २०२६ |

# कर हा करी...

करमणूक कर लावताना व्यापक पातळीवर अत्यंत कमी प्रमाणातील कर आकारल्यास त्यातून महसूल चांगला मिळेल व त्याचा भारही रसिक प्रेक्षकांवर पडणार नाही. मुंबई महापालिकेचा ८१ हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प नुकताच स्थायी समितीपुढे प्रशासनाने सादर केला. त्यात महापालिकेने नव्याने करमणूक कर आकारण्याचे प्रस्तावित केले असून सुमारे ५०० कोटी रुपये त्यातून उभे राहतील, असे प्रशासनाचे उद्दिष्ट आहे. करमणूक कर लागणार म्हणजे नाटक, सिनेमा लावण्याच्या खर्चात वाढ होणार अशी निर्मात्यांच्या गोटात भीती आहे, तर याचे गंडांतर येऊन तिकीटदर वाढणार का, अशा शंका व्यक्त केल्या जात आहेत. वस्तू व सेवा कर म्हणजेच जीएसटी लागू होण्यापूर्वी महापालिकांची बरीचशी भिस्त ही जकातीतून येणाऱ्या उत्पन्नावर व मालमत्ता करावर असे. अलीकडच्या काळात परिस्थिती पालटली असून भांडवली खर्चाचे प्रमाण महसुली खर्चाहून अधिक झाले आहे. मात्र त्याचवेळी महापालिकांना उत्पन्नाचे नवनवे स्रोत शोधावे लागत आहेत. मुंबई महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये करदात्यांव्यतिरिक्त शहराबाहेरून आलेल्या रुग्णांना काही विशिष्ट शुल्क आकारावे, असा एक प्रस्ताव गेल्या वर्षी चर्चिला गेला. फार पूर्वी दुचाक्या, चारचाक्या या वर्गवारीनुसार महापालिका चाकपट्टी आकारत असे. कालांतराने ते बंद झाले. करमणूक कराचे भवितव्यही आता नवनिर्वाचित नगरसेवकांच्या हाती आहे. करमणूक कार्यक्रमांचे आयोजक, नाट्यनिर्माते, सिनेनिर्माते यांचा साहजिकच करमणूक करास विरोध आहे. नाट्यगृहांच्या भाड्यात दरवर्षी शासननिर्णयानुसारच ठरावीक टक्क्यांनी वाढ होते व त्या भाड्यावरच जीएसटी आकारला जातो. त्यामुळे दोन्ही भाड्यांचे ओझे दरवर्षी वाढतच जाते. दहा-बारा टक्के करमणूक कर लावल्यास तिकिटांचे दर वाढवावे लागतील व तसे झाल्यास आधीच प्रेक्षकगृहांपासून फारकत घेतलेले प्रेक्षक नाटक-सिनेमा पाहण्यास येणार नाहीत, अशी त्यांना भीती वाटते. परंतु दुसऱ्या बाजूनेही विचार करून बघायला हरकत नाही. थेट दहा-बारा टक्के इतका भार न टाकता, नाममात्र रुपया-दोन रुपये इतकाच, परंतु बेस मोठा असेल म्हणजे व्यापक पातळीवर असा अत्यंत कमी प्रमाणातील कर आकारल्यास त्यातून महसूलही चांगला मिळेल व त्याचा भारही रसिक प्रेक्षकांवर पडणार नाही. मुंबईतील आलिशान खासगी प्रेक्षागृहांचा प्रेक्षकवर्ग दहा-बारा रुपयांच्या वाढीव आकाराने दुरावणार नाही. इथे प्रश्न आहे तो पोटाला चिमटा घेऊन कला, संस्कृती जपण्यासाठी कार्य करणारे समूह, हातातोंडाशी गाठ घालून चित्र किंवा नाट्यनिर्मिती करणारे ध्येयवेडे कलावंत यांच्यावर खूप मोठे ओझे पडणार नाही, याची काळजी घेतली जायला हवी. सर्वात मोठा प्रश्न म्हणजे करमणूक कर लावत असाल, तर त्या बदल्यात प्रेक्षकांना व कलावंत चमूंना तशा सुविधा मिळतात का? अनेक नाट्यगृहांची प्रसाधनगृहे म्हणजे अस्वच्छतागृहे झालेली असतात. पाण्याच्या बाटल्या सुरक्षेच्या कारणास्तव बाहेर काढून ठेवाव्या लागतात, परंतु स्वच्छ पिण्याचे पाणी आतमध्ये सहजी उपलब्ध नसते. ज्येष्ठ नागरिकांना लिफ्ट किंवा सुकर मार्ग सापडत नाही. नाटकांचे सेट्स, सामग्री आणण्यासाठी हायड्रॉलिक लिफ्ट नसतात, प्रवेशद्वारे अडचणीची असतात. स्त्रिया व ज्येष्ठ नागरिक यांच्या सोयीकडे दुर्लक्ष झालेले असते. मध्यंतरात उपाहारगृहात झुंबड उडते. ज्येष्ठ नागरिकांसाठी तेथे छोट्या टेबलांची व्यवस्था हवी. महापालिकेच्या मुलुंड येथील नाट्यगृहाच्या संकुलातील तरणतलावाशेजारी किफायतशीर उपाहारगृह होते, तिथे आता महागडे आलिशान रेस्तराँ पहायला मिळाले. या सर्व गोष्टी एका मोठ्या धोरणाचा एक छोटा भाग आहेत. मुंबई ही मनोरंजननगरी आहे व मनोरंजनासाठी रग्गड रक्कम देण्याची तयारी असणाऱ्यांकडून महापालिकेस थोडा महसूलही मिळाला, तर त्यात गैर काहीच नाही. परंतु त्यातून सुविधाही मिळायला हव्यात व सर्वांनाच एका तागडीत तोलल्यास कला-संस्कृती संवर्धनावर आघातही व्हायला नको. व्यापारी कमाई करणारे कोण व सेवाभावी कोण, याची ओळख पटविणे कठीण असते. त्यामुळेच कर आटोक्यात ठेवून संख्या मोठी व वसुली सुलभ हवी. सर्व घटकांना एकत्र आणून शुल्क व सुविधा यांचे त्रैराशिकही मांडावे. कर हा करी, देई शहरास उभारी, असे या करमणूक कराचे स्वरूप असावे.

# कृषी क्रांती, समाजकारण आणि शिक्षणाचे चालते-बोलते विद्यापीठ : कृषिरत्न विजयअण्णा बोराडे

**जालना ज्येष्ठ नागरिक मंचच्यावतीने शुक्रवार दि. ६ मार्च रोजी आयोजित कार्यक्रमात, राजस्थानचे महामहीम राज्यपाल आदरणीय श्री. हरिभाऊजी बागडे यांच्या हस्ते जालना गौरव पुरस्काराने सन्मानित होत असलेले कृषीरत्न विजय अण्णा बोराडे यांचे कार्य हे केवळ जालना जिल्ह्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण देशासाठी दिशादर्शक आहे. आंधळ्यांच्या गोष्टीतील हत्ती ज्याप्रमाणे प्रत्येकाला वेगळा भासतो, त्याप्रमाणे अण्णांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आहेत. कोणाला ते प्रयोगशील शेतकरी वाटतात, कोणाला हाडाचे इंजिनिअर, तर कोणाला एक संयमी समाजकारणी. त्यांच्या या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा हा शब्दप्रवास.**

**राजकीय वारसा आणि समांतर विचार :** विजय अण्णा बोराडे हे मूळचे सेलू तालुक्यातील पाटोदा या गावचे. त्यांचा जन्म सन ६ मे १९४६ चा. औरंगाबाद जिल्ह्यातील पिंप्री राजा हे त्यांचे आजोळ. समाजकारण आणि राजकारण यांची शिकवण व वारसा त्यांना आजोबा पद्मश्री सखाराम पाटील (औरंगाबाद जिल्हा परिषदेचे पहिले अध्यक्ष) यांच्याकडून मिळाला. त्यांच्यावर राजकीय आणि सामाजिक संस्कार एकाच वेळी झाले. वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी अण्णा औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष झाले होते. १९८०-८५ या काळात त्यांनी हे पद भूषवले. २८ डिसेंबर १९८० रोजी त्यांचा विवाह कर्नाटकातील मुळगाव मांगुर ( जि. बेळगाव) येथील उच्चशिक्षित मंगलाताई यांच्याशी झाला. त्यांचे शिक्षण कोल्हापूर येथे होम सायन्स झालेले असून, या दाम्पत्यांस सौ माधुरी निशांत शेवाळे (विवाहित) ही एक मुलगी असून त्यांचे शिक्षण एम. ए. बी.एड झालेले आहे. तर मुलगा डॉक्टर स्वरूप हा डॉक्टर (एम. एस.) आहे.

**राजकारणातून निवृत्ती :** १९९९ च्या लोकसभा निवडणुकीत शरद पवारांच्या आग्रहास्तव अण्णा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उमेदवार होते. मात्र, त्यांचा पिंड राजकारणाचा नसून समाजकारणाचा होता. त्यामुळे सत्तेच्या राजकारणापेक्षा रचनात्मक काम महत्त्वाचे मानून सक्रिय राजकारणातून ते दूर झाले आणि स्वतःला पूर्णपणे कृषी व शेतकऱ्यांच्या विकासासाठी वाहून घेतले. विजय अण्णा जरी निवडणुकीला उभे राहिले तरी त्यांचे वागणे राजकारण्यासारखे नव्हते. १९९९ च्या निवडणुकीत प्रचाराच्या भाषणात मते मागण्याऐवजी ते शेतकऱ्यांना ''बोंडअळीचे नियंत्रण कसे करावे?'' आणि ''कीड व्यवस्थापन कसे करावे?'' याचे धडे देत असत. शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये, हाच त्यांचा मुख्य उद्देश असे.

**लपलेला इंजिनिअर आणि यांत्रिकीकरण :** विजय अण्णांकडे उपजतच एक उत्कृष्ट इंजिनिअर दडलेला आहे. तरुणपणात गॅरेजमध्ये बसून मोटारसायकलचे ऑल मॉडिफिकेशन करणे असो किंवा मॅच मेकिंग (जुळणी) मधील कौशल्य असो, त्यांना यंत्रांची उत्तम जाण आहे. बैल-केणी आणि ट्रॅक्टर केणी :✲ शेतकऱ्यांना शेताचे बांध घालणे सोपे आणि स्वस्त व्हावे म्हणून त्यांनी बैल-केणी आणि पुढे ट्रॅक्टरला जोडता येईल अशी फ्रंट माऊंट केणी विकसित केली. हे त्यांचे मोठे योगदान आहे.

**रिचार्ज शाफ्ट :** विहिरींच्या पुनर्भरणासाठी त्यांनी कमी खर्चाचे रिचार्ज शाफ्ट तंत्रज्ञान वापरले, ज्यामुळे भूजल पातळी वाढण्यास मदत झाली.

**मराठवाडा शेती सहाय्य मंडळाच्या माध्यमातून कार्य :** अण्णा हे मराठवाडा शेती सहाय्य मंडळाचे सचिव आहेत. १९८३ मध्ये सुरू झालेला आडगाव प्रकल्प हा त्यांच्या कार्याचा मानबिंदू आहे. त्यांनी जलसंधारणासोबतच मृदसंधारण या संकल्पनेला महत्त्व दिले. माथा ते पायथा या तत्त्वावर काम उभे केले. सरकारी कंटूर बंडिंग पद्धतीतील त्रुटी ओळखून त्यांनी शेतकऱ्यांच्या मनानुसार आणि जमिनीच्या क्षमतेनुसार गट सर्वेक्षण ही पद्धत विकसित केली. यामुळे लोकांचा सहभाग वाढला आणि कामे टिकाऊ झाली. विजय अण्णांनी केवळ जमिनीवर काम केले नाही, तर प्रशासकीय पातळीवरही मोठे बदल घडवून आणले. पाणलोट कामांचे आयुष्य निश्चित नसल्याने नवीन निधी मिळत नसे. अण्णांनी विविध संदर्भ देऊन प्रत्येक कामास नूतनीकरणाची गरज असते तसेच पाणलोट, मृदसंधारण व जलसंधारणाससुद्धा नूतनीकरणाची गरज असते, हे आयुष्य ५- ७ वर्षे निश्चित करून घेतले. यामुळे राज्यात ३०- ३५ लाख हेक्टर क्षेत्रावर नवीन कामे करणे शक्य झाले.

**भूजल कायदा सुधारणा :** भूजल कायद्याच्या मसुद्यात शेतकऱ्यांच्या हितासाठी सुधारणा करण्यासाठी त्यांनी तज्ज्ञांच्या मदतीने १५ दिवस अभ्यास करून शासनाला सादरीकरण केले आणि कायद्यात बदल करण्यास भाग पाडले. हे काम त्यांनी अत्यंत संयमी पद्धतीने केले. शासनाने २०१४ मध्ये सॉइल हेल्थ कार्ड योजना आणली, पण अण्णांनी दूरदृष्टी ठेवून १९९४ पासूनच कृषी विज्ञान केंद्रात माती परीक्षण प्रयोगशाळा सुरू केली होती. आजतागायत ती चालू आहे.

**कृषी विज्ञान केंद्र स्थापना आणि विस्तार :** कोरडवाहू शेतकरी आणि विभागातील जनतेच्या सर्वांगीण समस्या सोडवण्यासाठी योग्य तंत्रज्ञान आणि दृष्टिकोन विकसित करण्यात येऊन कृषी विज्ञान केंद्राची स्थापना करण्यात आली आणि विस्तार होत गेला. सन २००६ मध्ये भारत सरकारतर्फे भारतातील ७०० कृषी विज्ञान केंद्रांपैकी सर्वोत्कृष्ट कृषी विज्ञान केंद्र म्हणून पुरस्कार मिळाला आहे ही जालना जिल्ह्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. कडवंची, शिवनी, आसरखेडा या निवडक गावांमध्ये जमीन आणि पाणी व्यवस्थापन सुधारण्यासाठी त्यांनी पाणलोट विकास तंत्रज्ञान, महिला विकास, कृषी प्रक्रिया आणि उत्पन्न वाढीसाठी विविध शेती उपक्रमांवर लक्ष केंद्रित केले. त्यांनी या माध्यमातून जिल्ह्यातील अनेक सामान्य कोरडवाहू शेतकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवले आहे. त्यांना कृषी प्रक्रिया, उद्योगावर मार्गदर्शन केले आहे. आज श्री. ईश्वरदास घनघाव हे आलू आणि केळी चिप्सच्या उद्योगाचे उद्योजक झाले आहेत तसेच महिला उद्योजकही त्यांनी उभ्या केल्या आहेत. उदाहरणार्थ कृषीभूषण श्रीमती सीताबाई मोहिते आणि श्रीमती संजीवनी जाधव, छायाताई मोरे हे उदाहरण समोर आहे.

अण्णांच्या संकल्पनेतून १९९७ साली जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे एक संघटन स्थापन झाले. या संघटन मधील शेतकऱ्यांना शेती क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान, नवीन संशोधन उपलब्ध व्हावे यासाठी अण्णांनी कृषी विज्ञान केंद्रामध्ये एक प्रशिक्षण हॉल उपलब्ध करून दिला ज्यामध्ये दर महिन्याला दर ५ तारखेला विविध पिकाविषयी महाराष्ट्रातील तज्ञ बोलावून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाते. हा उपक्रम आतापर्यंत अखंडपणे चालू आहे. त्या अंतर्गत आजवर ३४१ कार्यक्रम झाले आहेत. हा उपक्रम शेतकरी शेतकऱ्यांसाठी चालवीत आहेत. यालाच कृषी विज्ञान मंडळ म्हणतात.

दुष्काळग्रस्त व कोरडवाहू शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मराठवाडा शेती सहाय्य मंडळ अंतर्गत कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून निवडक गावांमध्ये जमीन आणि पाणी व्यवस्थापन सुधारण्यासाठी एक आकर्षक पाणलोट तयार केला. याचे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणजे कडवंची पाणलोट या कामामुळे या गावांमध्ये १५०० ( पूर्वी पूर्ण कोरडवाहू असलेले गाव) एकर द्राक्ष बागा दिमाखाने उभ्या आहेत. या गावाचे उत्पन्न ६५ लाखावरून ७० कोटी झाले आहे. आता हे गाव जालना जिल्ह्याचे कॉलिफोर्निया म्हणून ओळखले जाते. भारतातील अनेक मान्यवरांनी या गावात भेटी देऊन कार्याची माहिती घेतली. कृषी तंत्रज्ञानाच्या विस्तारात कृषी विज्ञान केंद्राने एक अग्रणी काम केले आहे. या मंडळामार्फत कृषी महाविद्यालय, कृषी पदविका, निवासी आमची शाळा आदी उपक्रम राबविले जात आहेत.

**बळीराजा करिअर अकॅडमी(विशेष उपक्रम)**

जिल्ह्यातील आर्थिक दुर्बल घटकातील गरीब व होतकरू गुणवंत शेतकऱ्यांच्या मुलांसाठी त्यांनी नीट आणि जेईई या वैद्यकीय तसेच अभियांत्रिकी प्रवेशाच्या तयारीसाठी करीअर अकॅडमी ची स्थापना केली आहे, जेणेकरून अकरावी आणि बारावी सायन्सचे ग्रामीण भागातील मुले अभियांत्रिकी आणि वैद्यकीय उच्च शिक्षण घेऊ शकतील. बळीराजा करिअर अकॅडमी चे सुपर ४० मॉडेल हे महाराष्ट्रातील एक अद्वितीय आणि देशातील मोजक्या मॉडेलपैकी एक आहे, जिथे प्रत्येक विद्यार्थ्यावर वर्षाला १ लाख रुपये याप्रमाणे ८० विद्यार्थ्यांवर ८० लाख रुपये खर्च केले जातात. या विद्यार्थ्यांची निवड अत्यंत पारदर्शीपणे केली जाते. या मॉडेलमध्ये विद्यार्थ्यांचे शिक्षण, जेवण आणि राहण्याचा (वसतिगृह) खर्च पूर्णपणे मोफत असतो. पहिल्या बॅचमधील अकरावी विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा निकाल अत्यंत उत्तुंग लागला असून, गोपाल दत्ता खैरे याने जेईई परीक्षेत ९८.३३% मिळविले आहे. तर शुभांगी बळीराम वाडेकर या विद्यार्थिनीने नीटमध्ये ७२० पैकी ६४६ गुण मिळवून ती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय एमबीबीएस प्रवेशासाठी पात्र ठरली आहे. गोपाल खैरे विद्यार्थ्याने आयआयटी या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत यश मिळवले असून, त्याने राष्ट्रीय पातळीवरील यश संपादन करून आयआयटीला प्रवेश मिळविला. अण्णांनी त्याच्यासाठी स्कॉलरशिपची सोय देखील केली आहे. याशिवाय करण राठोड या विद्यार्थ्याला एनआयटी नागपूरमध्ये प्रवेश मिळाला आहे. शिवकन्या तुपे हिला पुणे येथील प्रख्यात मुलींच्या कमिन्स या अभियांत्रिकी महाविद्यालयात, पल्लवी वरे हिला पुणे येथील शाहू कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला असून, या अकॅडमीचे ५ विद्यार्थी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, २ विद्यार्थी आयआयटी, १८ विद्यार्थी बीएएमएस तर २१ विद्यार्थी शासकीय इंजिनिअरिंग महाविद्यालयाच्या प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत.गरीब मुलांच्या उद्धारासाठी आणि त्यांच्या शिक्षणासाठी अण्णांचे हे व्हिजन अत्यंत प्रभावी मानले जात आहे. मुलींसाठी वस्तीग्रह बांधण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

**'पैठणी साडी' निर्मितीचा अभिनव उपक्रम**

महिला सक्षमीकरण आणि स्वावलंबनाचा केवळ विचार न मांडता, जालना येथील कृषी विज्ञान केंद्राने प्रत्यक्ष कृतीतून एकल, विधवा आणि परित्यक्ता महिला तसेच गरजू महिलांना आधार देण्याचे काम सुरू केले आहे. जिल्हा नियोजन समिती आणि जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून आणि सामाजिक दृष्टिकोनातून दुर्लक्षित राहणाऱ्या या भगिनींना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी विजयअण्णा बोराडे यांच्या मार्गदर्शनाखाली आता पैठणी साडी निर्मितीचे विशेष प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. यासाठी विशेष शेड उभारण्यात आले असून तिथे लूम्स (माग) बसवण्यात आले आहेत. या प्रकल्पांतर्गत महिलांना तीन महिन्यांचे पैठणी साडी तयार करण्याचे तांत्रिक प्रशिक्षण दिले जात आहे. या उपक्रमात प्रामुख्याने समाजातील एकल, विधवा, परित्यक्ता आणि अत्यंत गरीब कुटुंबातील महिलांना प्राधान्य दिले जात आहे. पहिल्या बॅचमध्ये ३० महिला प्रशिक्षण घेत असून, त्यामध्ये ३० टक्के महिला या एकल प्रवर्गतील आहेत. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर या महिलांना शासनाच्या मदतीने स्वतःचा लूम (माग) उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे, जेणेकरून त्या कायमस्वरूपी रोजगाराशी जोडल्या जातील. कृषी विज्ञान केंद्र केवळ शेतीच नव्हे, तर ग्रामीण महिलांच्या आयुष्यात आर्थिक स्थैर्य आणण्यासाठी कटिबद्ध असून, तुती लागवडीसोबतच रेशीम उद्योगाला जोड देणारा हा पैठणी प्रकल्प महिलांसाठी आशेचा किरण ठरत आहे.

**पाणलोट क्षेत्रातील क्रांती**

अण्णांच्या मार्गदर्शनाखाली कडवंची गावात जलसंधारण आणि द्राक्ष शेतीचा जो प्रयोग झाला, त्यामुळे आज या गावाचे वार्षिक उत्पन्न १५- २० कोटींच्या घरात आहे. मोतीलाल नेहरू आणि महात्मा गांधींच्या ''कर के देखो'' या मंत्रावर अण्णांचा विश्वास आहे. भाषणे देण्यापेक्षा स्वतः झाडू घेऊन रस्ते साफ केल्यावर गावकरी आपोआप जमा होतात, हा त्यांचा अनुभव आहे. वैजापूर तालुक्यात त्यांनी एका आठवड्यात लोकसहभागातून ५२ विहिरींचे पुनर्भरण करून दाखवले. कृषी कार्यक्रमात महिलांचा सहभाग वाढावा आणि त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे म्हणून त्यांनी पुरुषी मक्तेदारी मोडून काढत, खास महिलांसाठी कोजागिरी पौर्णिमा साजरी करण्याची प्रथा सुरू केली. अण्णांची चर्चा करण्याची पद्धत रचनात्मक असते. ते समोरच्याचे पूर्ण ऐकून घेतात. वाद टोकाला गेला तर तो विषय खुबीने बदलून सकारात्मक वळणावर आणतात.

या सर्व कामांमध्ये अण्णा यांना मंडळाचे विश्वस्त माननीय कै. बॅरिस्टर जवाहर गांधी आणि जागतिक अन्न पुरस्कार प्राप्त कै. बद्रीनारायण बारवाले यांचे भरीव सहकार्य आणि मार्गदर्शन मिळाले. सध्या सर्व विश्वस्तांचे त्यांना भरीव सहकार्य लाभत आहे.

असे हे व्रतस्थ, प्रयोगशील आणि ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व विजय अण्णा बोराडे यांचा जालना गौरव पुरस्काराने होणारा सन्मान हा समस्त जालनावासियांसाठी अभिमानाचा क्षण आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस उदंड शुभेच्छा!

**– ज्ञानदेव पायगव्हाणे**
**ज्येष्ठ पत्रकार**

# आत्मबोधाचा शाश्वत आनंद



मातेच्या गर्भात असताना जीवाला स्वस्वरूपाची जाणीव असते . पण गर्भामध्ये '' सोहं सोहं '' करणारा हा जीव जन्माला आल्यानंतर मात्र त्याला देहबुद्धी प्राप्त होते आणि '' कोहं कोहं '' असा आक्रोश करायला लागतो. मायेच्या प्रभावामुळे परमात्म्यापासून हा जीव दूर जातो. मी म्हणजे देहच याच भ्रमात तो जीवन जगतो आणि अहं मध्ये बद्ध होतो. स्वताचा अहं कुरवाळण्यात आनंद मानणारा हा जीव या भवसागरातून पार कसा होणार ? मायेत गुरफटलेल्या आणि स्वस्वरूप विसरलेल्या अशा या जीवाला या मायानदीतून पार व्हायचे असेल तर त्याचा उगम ज्याठिकाणी आहे त्याठिकाणी पोहोचण्याचा प्रयत्न करायला हवा. सूक्ष्माकडून स्थूलाकडे जाणे हा जरी मायेचा स्वभाव असला तरी त्याच्या प्रभावापासून वाचण्यासाठी नदीच्या प्रवाहा बरोबर वाहत न जाता त्याच्या विरुद्ध दिशेने पोहत जाऊन भगवंता चरणी विलीन होणे हेच अंतिम ध्येय असायला हवे.या मोहरूपी मायेपासून अत्यंत सावधपणे जीवाने स्वत:ला बाजूला नेऊन परमेश्वराचे स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न करायला हवा. आत्मा हाच ईश्वर आहे आणि हे जाणून घ्यायचे असेल तर प्रथम अहंचा त्याग करणे गरजेचे आहे. देहबुद्धी मध्ये अडकलेला जीव कनिष्ठ देवांमध्ये अडकतो अन मुख्य देवापासून दूर राहतो.

मानवी मन हे अत्यंत चंचल आहे पण या मनाचा, प्रवृत्तीचा जर अभ्यास केला तर सत पासून जन्माला आलेले मन मूळात सज्जनच आहे. पण कल्पनेमध्ये रमणारे चंचल मन आपल्या मूळ प्रवृत्ती पासून दूर जाऊन इतर गोष्टींमध्येच रमते. आणि अशाश्वत जगात रमलेले मनच जीवाला शाश्वत सुखापासून दूर ठेवते म्हणून मनालाच उत्तम विचार करायला प्रवृत्त केले पाहिजे. उत्तम विचार, उत्तम संगत, उत्तम चिंतन मननाची सवय लावून परमेश्वर प्राप्ती कशी करुन घ्यावी हे आपल्याला श्रीमद्भगवद्गीता, दासबोध या ग्रंथातून शिकायला मिळते. शुद्धज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी मानवी मनावर जो अज्ञानाचा पडदा आहे तो दूर झाला पाहिजे. खरे तर जीव आणि ईश्वर यामध्ये द्वैत नाही पण मायेमुळे जीवाला ईश्वराचे विस्मरण झाले आहे. 'मी म्हणजे देह' आणि माझ्यापेक्षा ईश्वर काही वेगळा हा भ्रम जीवाला झाला. परंतु जीवशिव हे एकरूपच आहेत ही एकरूपत्व जाणून घेण्यासाठी जीवाने भक्तिमार्गाचा अवलंब करावयास हवा.

माणसाला आपल्या मूळ स्वरूपाचा शोध घ्यावयाचा असेल तर त्यासाठी मायेचा त्याग करावा लागेल. भगवंताचे कर्तुत्व विलक्षण आहे तसेच ही माया मोठी विचित्र आहे. या मायेमध्ये रमल्यामुळेच माणसाचे मन अस्थिर राहते. माणसाचे मन कायम कल्पनेमध्ये रमून जाते. यामुळे त्याचे मन कधीच एकाग्र होऊ शकत नाही.

चंचल मनालाच सतत भगवंताचे चिंतनात रमवायला हवे.

मन इंद्रियांच्या पातळीवर विषयसुखाचा विचार करत राहते. तेव्हा ती माया माणसाच्या बंधनास अथवा पुनर्जन्मास कारणीभूत ठरते. पण मनातील विचार भगवंतासंबंधीचे असतील तर हळूहळू हेच मन साधकाला निर्विचार करून हीच माया साधकाला बंधनातून मुक्त करण्यास उपयोगी ठरू शकते. त्यासाठी साधकाने एकांतात राहून सतत साधना करणे गरजेचे आहे. अहंकार आणि वासना यामुळे माणूस दृश्य जगातील सगळ्यांना माझे माझे म्हणत राहतो. इतरांकडून अपेक्षा करीत राहतो आणि इतरांच्या अपेक्षापूर्ती करू शकत नाही . अशा या विचित्र चक्रात तो सापडतो आणि या अपेक्षापूर्तीच्या खेळात मनुष्य अधिकाधिक मायेत गुरफटत जातो. या चक्रातून सुटण्यासाठी अहंकाराचा आणि वासनेचा त्याग करायला हवा. देहबुद्धी ते आत्मबुद्धी साध्य करण्यासाठी साधना उपासना याच्या माध्यमातून शाश्वत आनंद प्राप्त करून घ्यायला. सर्व सुखाचा सागर असणा-या भगवंताला आपले सर्वस्व मानले तरच या मनाला खरा शाश्वत आनंद प्राप्त होणार आहे. मन हे सिद्धीचे कारण आहे . मनाच्या प्रसन्नतेवर अनेक गोष्टी अवलंबून आहेत हे जाणून तसेच मनाचे सामर्थ्य ओळखून मनाला विवेकाने आवर घालून त्याला रामरूपी करायला हवे तेंव्हाच आत्मबोधाचा शाश्वत आनंद प्राप्त होईल.

**– अर्चना सरोदे**

# 'लिगो इंडिया' प्रकल्पातील विकास कामांचा जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्याकडून आढावा



**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** जिल्ह्यातील दुधाळा येथे चार वर्षाच्या कालमर्यादेत गुरुत्वाकर्षण-लहरींचा अभ्यास करणारी अत्याधुनिक वेधशाळा 'लिगो इंडिया' अंतर्गत येणाऱ्या विविध विकासप्रकल्पांचा आढावा जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज येथे घेतला. यावेळी लिगो इंडिया या प्रकल्पाच्या विकासाकामांची प्रगती ही समाधानकारक असून, विहित कालावधीत कामे पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी संबंधितांना दिले.

यावेळी उपविभागीय अधिकारी विकास माने, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) राजेश सरवदे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सुदेश देशमुख, तहसीलदार हरिष गाडे, लिगो इंडियाचे संचालक के. महापात्रा, जिल्हा अधीक्षक भूमिअभिलेख प्रशांत बिलोलीकर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे उपअभियंता एन. डी. कोकडवार यांच्यासह लार्सन अँड टुब्रोची टेक्निकल टीम यावेळी उपस्थित होते.

अमेरिका-भारत-जर्मनी-ऑस्ट्रेलिया-यूके यांच्या सहकार्याने पुढील चार वर्षांत बांधण्यात येत असलेल्या या प्रकल्पासाठी लागणारे अतिरिक्त भूसंपादन करण्याच्या प्रक्रियेसाठी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली ही आढावा बैठक पार पडली. या प्रकल्पाच्या कामकाजासाठी आवश्यक भूसंपादन मोजणी पुढील सात दिवसांमध्ये करण्याचे संबंधित यंत्रणेला निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. लिगो इंडिया या प्रकल्पातून यापूर्वी गेलेल्या विविध नागरी सुविधांचे कार्यान्वयन करणाऱ्या यंत्रणांनी त्या सोयी-सुविधा प्रकल्पाच्या बाहेरील परिसरातून वळविण्यात याव्यात. तसेच या कामासाठी लागणाऱ्या अतिरिक्त भूसंपादनाची प्रक्रिया तात्काळ पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

औंढा नागनाथ तालुक्यातील दुधाळा येथे उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पाचे काम २०३० पर्यंत पूर्ण होऊन तो प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणार आहे. हा प्रकल्प जगातील सर्वात संवेदनशील इंटरफेरोमीटरपैकी एक राहणार असून, तो खगोल भौतिकशास्त्रातील संशोधनाचे एक प्रमुख केंद्र असेल. भविष्यात या प्रयोगशाळेतून वैश्विक घटनांमुळे निर्माण होणाऱ्या गुरुत्वाकर्षण लहरींचा शोध घेता येणार असल्याचे जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी सांगितले.

भारताचा अणुऊर्जा विभाग, विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग युनायटेड स्टेट्समधील लिगो प्रयोगशाळेच्या सहकार्याने या प्रकल्पावर काम सुरु आहे. जगभरातील लिगो वेधशाळांच्या जागतिक नेटवर्कमध्ये हे पाचवे राहणार आहे. हा प्रकल्प खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्रातील भारताच्या क्षमता वाढवेल आणि तरुणांना या क्षेत्रात संशोधन करण्यास प्रेरित करेल. त्यामुळे या प्रकल्पाची सर्व प्रकिया तात्काळ पूर्ण करण्याबाबत आढावा घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

# वसमतमध्ये जागतिक महिला दिनानिमित्त ७ दिवसीय स्टिक आत्मसंरक्षण शिबिराचा शुभारंभ



**आत्ताच एक्सप्रेस**

**वसमत–** महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या घटनांना आळा घालण्यासाठी आणि महिलांना शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी आत्मरक्षा अँड ऑल कराटे मार्शल आर्ट स्पोर्ट तर्फे एक स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला आहे. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून वसमत येथील श्री संत शिरोमणी माऊली महाराज मंदिर येथे ७ दिवसीय मोफत स्टिक (काठी) आत्मसंरक्षण प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

आजच्या युगात महिलांना स्वसंरक्षणाची कला अवगत असणे अत्यंत गरजेचे आहे. या भावनेतून मास्टर सोमनाथ हेगू यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर राबविण्यात येत आहे. या शिबिरामध्ये मुलींना आणि महिलांना संकटाच्या वेळी स्वतःचा बचाव कसा करावा, विशेषतः स्टिकचा (काठीचा) प्रभावी वापर करून प्रतिस्पर्ध्याला कसे रोखावे, याचे सखोल प्रशिक्षण दिले जात आहे. या सात दिवसीय शिबिरात अनुभवी प्रशिक्षकांकडून बारकावे शिकवले जात आहेत. यामध्ये प्रामुख्याने मास्टर सीमा पाठक आकांक्षा दवणे सोमनाथ हेगू संभाजी कुसळे सर्व प्रशिक्षक महिलांना प्रतिकार करण्याचे विविध तंत्र आणि कौशल्ये शिकवत आहेत.शिबिराच्या पहिल्या दिवसापासूनच वसमत शहरातील महिला आणि विद्यार्थिनींचा मोठा प्रतिसाद लाभत आहे. माऊली महाराज मंदिराच्या पवित्र परिसरात सुरू असलेल्या या उपक्रमाचे शहरवासीयांकडून कौतुक होत आहे. हे शिबिर पूर्णपणे मोफत असल्याने जास्तीत जास्त महिलांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# बाळापुर हद्दीत जुगारावर छापा, ११ जुगारीसह २ लाख ५३ हजाराचा मुद्देमाल जप्त

## स्थानिक गुन्हे शाखा व पोस्टे बाळापूरची संयुक्त कार्यवाही




**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** हिंगोली जिल्हा हद्दीतील अवैध धंद्याचा शोध घेऊन समुळ उच्चाटन करण्याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षक मा. डॉ. नीलाभ रोहन यांनी वारंवार सूचना देत असून त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे व पोलीस स्टेशनचे पथक वेळोवेळी कार्यवाही करीत आहे.

दिनांक ०६ मार्च २०२६ रोजी पोलीस स्टेशन बाळापुर हद्दीत डोंगरकडा फाटा येथे सखाराम अडकिने यांच्या शेतातील आखाड्यावर झन्ना मन्ना नावाचा जुगार चालू आहे अशी गोपनीय माहिती मिळाल्यावरून स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस स्टेशनच्या पथकांनी छापा मारला असता

सदर ठिकाणी १) राजेश गेंदुलाल जैस्वाल वय ५८ वर्षे रा. डोंगरकडा ता. कळमनुरी जि. हिंगोली २) देवानंद प्रभु सरोदे वय ५४ वर्षे रा. डोंगरकडा ता. कळमनुरी ३) दुर्गादास बापुराव अडकिणे वय ५२ वर्षे रा. डोगरकडा ता. कळमनुरी ४) किसन तुकाराम गावंडे वय ७२ वर्षे रा. डोगरकडा ता. कळमनुरी ५) शिवलाल किसन राठोड वय ६० वर्षे रा. वरूड तांडा ता. कळमनुरी ६) बालाजी भिमराव गावंडे वय ३४ वर्षे रा. डोंगरकडा ता. कळमनुरी ७) दिलीप माधवराव कुरूंदकर वय ४५ वर्षे रा. वरूड तांडा ता. कळममनुरी ८) सुरज खुबा पवार वय ४० वर्षे रा.झुनझुनवाडी ता. कळमनूरी ९) मधुकर रामराव गावंडे वय ६० वर्षे रा. डोंगरकडा ता. कळमनुरी १०) प्रकाश खिरू राठोड वय ५७ वर्षे रा.भाटेगाव ता. कळमनुरी ११) मोहन कचरू राठोड वय ३९ वर्षे रा. भाटेगाव ता. कळमनुरी जि. हिंगोली या इस्मानी अवैधरित्या यांना जुगार खेळत असताना मिळून आल्याने त्यांना ताब्यातुन रोख रक्कम, नऊ मोबाईल, तीन मोटरसायकल असा २ लाख ५३ हजाराचा मुद्देमाल जप्त करून पोलीस स्टेशन बाळापुर येथे गुन्हा दाखल करण्यात करण्याची प्रक्रिया चालू आहे.

सदरची कार्यवाही श्री नीलाभ रोहन, पोलीस अधीक्षक हिंगोली, श्री कमलेश मीना, अप्पर पोलीस अधीक्षक हिंगोली, श्री मोहन भोसले पोनि स्थागुशा , श्री विष्णुकांत गुट्टे पोनि बाळापुर.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिवसांब घेवारे, पोलीस अंमलदार भुजंग कोकरे, आमलदार नागरगोजे पोलीस अंमलदार जाधव, हरिभाऊ गुंजकर आकाश टापरे , साईनाथ कंटे ,नरेंद्र साळवे ज्ञानेश्वर गोरे, यांच्या पथकाने केली आहे.

# जिल्ह्यातील ३४३ पदासाठी पोलीस पाटील पदभरती

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरामध्ये उमेदवारांना मिळणार नियुक्तीपत्रे- जिल्हाधिकारी राहुल गुप्ता

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** हिंगोली जिल्ह्यात पोलीस पाटलाची ६४७ पदे मंजूर असून, ३४३ पदे रिक्त होती. या रिक्त पदांची भरती प्रक्रिया पूर्ण करण्याची कार्यवाही जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच राबविण्यात आली आहे. यामध्ये पात्र उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी करून त्यातील काहींना प्रातिनिधीक स्वरुपात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरामध्ये नियुक्ती आदेश वितरीत करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिली.

लेखी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या मुलाखतीनंतर तात्पुरत्या निवडीस पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी सोमवार, दि. ०२ रोजी www. Hingolipp.recruitonline.in या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आली होती. दि. ४ व ५ फेब्रुवारी, २०२५ रोजी निवड झालेल्या उमेदवारांच्या विविध पथकामार्फत कागदपत्राची पडताळणी करुन त्यांना नियुक्ती आदेश देण्यात आल्याचे जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी कळविले आहे. जिल्ह्यातील ३४३ रिक्त पदांमध्ये हिंगोली तालुक्यातील ७६, सेनगाव ६५, कळमनुरी ८९, वसमत ५७ आणि औंढा नागनाथ तालुक्यातील ५६ पदांचा समावेश आहे. या भरती प्रक्रियेमध्ये पोलीस पाटील पदासाठी गावनिहाय आरक्षण निश्चित करण्यासाठी दि. १ ते ५ जानेवारी, २०२६ दरम्यान जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली होती. या आरक्षणावर ६ ते ७ जानेवारी, २०२६ या दोन दिवसात आक्षेप मागविण्यात आले होते. त्यानंतर दि. ८ ते १० जानेवारी, २०२६ या कालावधीत जाहिरात प्रसिद्ध करुन दि. १२ ते २६ जानेवारी, २०२६ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. दि. २७ ते ३० जानेवारी, २०२६ या दरम्यान प्राप्त अर्जाची छाननी करुन अर्जदारांना प्रवेशपत्रे वाटप करण्यात आले होते.

हिंगोली जिल्ह्यातील रिक्त पदांसाठीची लेखी परीक्षा २१ केंद्रांवर दि. ८ फेब्रुवारी, २०२६ रोजी शांततेत व शिस्तबद्धरित्या घेण्यात आली. या परीक्षेसाठी ४ हजार ६३९ उमेदवारांनी अर्ज केले होते. त्यापैकी ४ हजार ४७२ अर्ज पात्र ठरले होते. दि. ८ फेब्रुवारी, २०२६ रोजी झालेल्या परीक्षेसाठी ४ हजार ३७९ उमेदवार उपस्थित राहिले, तर ९३ उमेदवार गैरहजर होते. प्रथम उत्तरतालिका दिनांक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. प्रश्नपत्रिका व उत्तरतालिकेबाबत लेखी आक्षेप व हरकती सादर करण्यासाठी दिनांक ९ फ ेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत संबंधित उपविभागीय अधिकारी कार्यालयात समक्ष उपस्थित राहून सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. अंतिम उत्तरतालिका दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता प्रसिद्ध करण्यात येऊन त्याच दिवशी लेखी परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. लेखी परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दि. १२ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत विविध पॅनलच्या माध्यमातून पार पडल्याचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# हिंगोली येथे पोलीस भरतीच्या शेवटचा दिवस



**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** शहरातील संत नामदेव पोलीस कवायत मैदानावर दिनांक ५/३/२०२६ पोलीस भरतीचा शेवटचा दिवस असून आज सकाळी चार वाजल्यापासूनच महिला पोलीस भरतीसाठी महिला उमेदवार आल्या होत्या. यावेळी एकूण ६४ जागेसाठी जवळपास ८०००/ पेक्षा जास्त उमेदवारांनी भरती प्रक्रिया केली आहे. यावेळी एका महिला भरती उमेदवाराची चाचणी घेताना हिंगोली डी.वाय.एस.पी. वाघमारे, ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्याम कुमार डोंगरे, स्थानिक गुन्हे शाखेचे स.पो.नि. शिवसांब घेवारे, महिला पो.उप.नि. श्रीदेवी वग्गे आदी उपस्थित होते

# रिक्त जागा भरा अन्यथा उपोषण करणार-पवन जाधव पाटील

**आत्ताच एक्सप्रेस**



**हिंगोली–** हिंगोली तालुक्यातील आरोग्य केंद्र सिरसम अंतर्गत असलेले उपआरोग्य केंद्र लासिना येथे समुदाय आरोग्य अधिकारी,आरोग्य सेवक व सेविका या रिक्त जागा तात्काळ न भरल्यास १२ मार्च गुरुवार रोजी पवन जाधव पाटील उपोषण करणार आहेत.

आरोग्य केंद्र सिरसम अंतर्गत असलेले उप आरोग्य केंद्र लासिना येथे समुदाय आरोग्य अधिकारी,आरोग्य सेवक,आरोग्य सेविका या जागा रिक्त आहेत. याठिकाणी उपआरोग्य केंद्र बोरी शिकारी येथील अधिकाऱ्यांना अतिरिक्त चार्ज दिलेला आहे.त्या अधिकाऱ्यांना अतिरिक्त चार्ज असल्यामुळे उपआरोग्य केंद्र लासीना येथे त्यांचे दुर्लक्ष होत आहे.त्यामुळे लासीना येथील गावकऱ्यांची गैरसोय होत आहे.गावकऱ्यांची होणारी गैरसोय होऊ नये यासाठी तात्काळ जागा भरण्यात याव्या, अन्यथा येत्या १२ मार्च २०२६ वार गुरुवार रोजी सकाळी ११ वाजेपासून तालुका आरोग्य अधिकारी यांच्या कार्यालयाजवळ बेमुदत उपोषण करणार असल्याचे निवेदन जिल्हा आरोग्य अधिकारी यांना पवन जाधव पाटील यांनी दिले आहे.

# जिल्ह्यात १३ हजार २८८ मुलींना मोफत देणार कर्करोगावरील सुरक्षा लस

## प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयात मिळणार एचपीव्ही लस, खासगी रुग्णालयात मोजावे लागतील १० हजार रुपये

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** दैनंदिन जीवनात बदलत्या जीवनशैलीमुळे महिलांमध्ये कर्करोगाचा धोका वाढत असताना, सार्वजनिक आरोग्य विभागाने गर्भाशय मुखाच्या कर्करोगाला प्रतिबंध घालण्यासाठी कंबर कसली आहे. राज्य शासनाच्या निर्देशनुसार जिल्हाधिकारी राहुल गुप्ता व मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली १४ वर्षे पूर्ण झालेल्या पण १५ वा वाढदिवस साजरा न केलेल्या (जन्म तारीख ८ मार्च २०११ ते ७ मार्च २०१२ या कालावधीत जन्मलेल्या) जिल्ह्यातील सुमारे १३ हजार २८८ किशोरवयीन मुलींना गर्भाशयाच्या मुख कर्करोगावरील (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) प्रतिबंधात्मक लस मोफत दिली जाणार आहे.

गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण करण्यासाठी हिंगोली जिल्ह्यात जिल्हा प्रशासनमार्फत एचपीव्ही सुरक्षित लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. ही लस पूर्णतः सुरक्षित असून, या लसीमुळे भविष्यात मुलींना गर्भाशय मुख कर्करोग होणार नाही. या मोहिमेचा जिल्ह्यातील सुमारे १३ हजार २८८ मुलींना थेट फायदा होणार आहे. सर्व पालकांनी या मोहिमेमध्ये आपल्या मुलींना ही लस द्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने पालकांना केले आहे.

गर्भाशय मुखाचा कर्करोग हा महिलांमधील दुसऱ्या क्रमांकाचा जीवघेणा आजार ठरत आहे. खासगी रुग्णालयांत या एका लसीसाठी जवळपास १० हजार रुपये मोजावे लागतात. त्यामुळे ही लस सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर आहे. हीच लस आता जिल्ह्यातील शासकीय आरोग्य संस्थेमध्येच आयुष्यमान आरोग्य मंदिर, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय आणि उपजिल्हा रुग्णालयांमध्ये सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत विनामूल्य मिळणार आहे. ही लस घेतल्यास कर्करोगाचा धोका ९९ टक्क्यांनी कमी होतो.

गर्भाशय कर्करोग: वेळीच सावधनता बाळगावी

अस्वच्छता, असुरक्षित संबंध आणि हार्मोनल बदलांमुळे महिलांमध्ये गर्भाशय मुखाचा कर्करोग वाढतोय. सध्या हा आजार महिलांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहे. हा आजार झाल्यावर उपचार करण्यापेक्षा वयाच्या १४ ते १५ व्या वर्षी एचपीव्ही लस घेणे हाच सर्वोत्तम प्रतिबंधात्मक उपाय आहे. सरकारी रुग्णालयात मोफत उपलब्ध होणार असल्याने ग्रामीण भागातील मुलींनाही या महागड्या लसीचा लाभ घेता येणार आहे. त्यामुळे भविष्यातील पिढी आरोग्यदायी राहील. त्यामुळे किशोरवयीन मुलींच्या पालकांनी ही लसीकरण करून घ्यावे. ही लस एकदम सुरक्षित असून, जगात जवळपास ८० देशात ही लस किशोरवयीन मुलींना यशस्वी दिलेली आहे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस यांनी केले आहे.

मोहीम यशस्वी राबवण्यासाठी सर्व डॉक्टर, अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले असून, वैद्यकीय अधिकारी यांच्या देखरेखखाली प्रशिक्षित स्टाफमार्फत फक्त आरोग्य संस्था, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, सामान्य रुग्णालय वैद्यकीय महाविद्यालयामध्येच दिली जाणार आहे. हे एचपीव्ही लसीकरण पूर्णपणे ऐच्छिक आहे. लसीकरणासाठी पालकाची संमती अनिवार्य असून, ती यु-विन पोर्टलवर डिजिटल स्वरुपात किंवा इंटरनेट नसल्यास लेखी स्वरुपात घेतली जाईल. लसीकरणानंतर डाव्या हाताच्या तर्जनीवर शाईने चिन्ह केले जाईल. मुलींनी उपाशीपोटी लस घेऊ नये; पालकांनी त्यांना नाश्ता देऊन लसीकरणासाठी पाठवावे, लसीकरणानंतर किमान ३० मिनिटे निरीक्षणाखाली थांबणे आवश्यक आहे. ही लस अत्यंत सुरक्षित आहे. असे डॉ. सतिश रुणवाल, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी यांनी सांगितले आहे.


दैनिक निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस
परभणी-हिंगोली व नांदेड जिल्हयासाठी
पत्रकार पाहिजेत
महाराष्ट्रातील दै. आत्ताच एक्सप्रेस या लोकप्रिय वृत्तपत्राच्या परभणी-नांदेड व हिंगोली आवृत्तीसाठी तालुका व शहर पातळीवर अनुभवी किंवा नवीन पत्रकार नेमणे आहे. ज्यांना पत्रकारीता क्षेत्रात काम करण्याची आवड आहे अशा होतकरु पत्रकारांनी संपर्क करावा.
नांदेड जिल्हा : अर्धापुर, भोकर, बिलोली, देगलूर, हदगाव, हिमायतनगर, कंधार, लोहा, मुदखेड, मुखेड, नांदेड, नायगांव आणी उमरी
परभणी जिल्हा : परभणी, गंगाखेड, सोनपेठ, पाथरी, मानवत, पालम, सेलू, जिंतुर आणि पुर्णा
हिंगोली जिल्हा : हिगोली, कळमनुरी, वसमत, औंढा नागनाथ आणि सेनगाव
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे
आवृत्ती संपादक : आत्ताच एक्सप्रेस
संपादक : मराठीबाणा न्युज LIVE
अध्यक्ष : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,किनवट
संपर्क कार्यालय : उपजिल्हा रुग्णालय मार्ग,गोकुंदा ता.किनवट जि.नांदेड
मो.9022822289, 7066650600
Email : attachexpressparbhani@gmail.com

# बाबा सोनापीर उर्सांला सुरुवात, हजारो भाविकांच्या उपस्थितीत पवित्र संदल संपन्न

## मुजावर मुतवली शेख बाबर फकीर मोहम्मद सज्जादानशीन साजिद उल्लाह जागीरदार यांनी अर्पण केली संदलची पवित्र चादर

* आत्ताच एक्सप्रेस
लक्ष्मीकांत मुंडे

**श्रीक्षेत्र माहूर –** माहूर शहरातील सुफी संत बाबा सोनापीर दर्गाह येथे दरवर्षी मोठ्या भक्ती भावात साजरा होणाऱ्या उर्सांला दि ५ रोजी सुरुवात झाली असून दुपारनंतर परचम कुशाइ ध्वजारोहण झाल्यानंतर दर्गाह चे मुतवल्ली मुजावर शेख बाबर अहमद फकीर मोहम्मद यांचे सह सज्जादा नशीन साजिद ऊल्लाह जागीरदार यांचे सह हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत बाबा सोनापीर दर्गाह मधील पवित्र मजार वर संदल सह पवित्र चादर अर्पण करण्यात आली

दरवर्षी पाच दिवस चालणाऱ्या या उर्सात लाखो भाविक हजेरी लावतात पवित्र रमजान महिना असल्याने दररोज सायंकाळी सर्वधर्मीय भाविकांची प्रचंड गर्दी होते संदलच्या दिवशीही हजारो भाविकांनी संदल मध्ये सहभागी होऊन उर्सात आलेले आकाश पाळणे झुले लहान मुलांना खेळण्याच्या विविध कलाकृती सह शीत पेयाचे स्टॉल्स हॉटेल नाश्ता कपडे व इतर साहित्य मिळण्याचे स्टॉल्स लागल्याने आलेल्या भाविकासह नागरिकांनी मोठ्या प्रमाणात खरेदी करत बालगोपाला सोबत आनंदोत्सव साजरा केला

पाच दिवस चालणाऱ्या या उर्सात कुठलीही आणि अनुचित घटना घडू नये म्हणून तहसीलदार अभिजीत जगताप उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे पोलीस निरीक्षक देविदास चोपडे मुख्याधिकारी विवेक कांदे तालुका आरोग्य अधिकारी डॉ राजेश माचेवार वैद्यकीय अधीक्षक ओमप्रकाश साबळे मरावीचे अभियंता राहुल शेंडे नायब तहसीलदार कैलास जेठे नायब तहसीलदार अरुणाताई सूर्यवंशी सपोनी शरद घोडके पोउपनि संदीप अन्येबोईनवाड पोउपनी पालसिंग ब्राह्मण पोऊपनि बाबू जाधव यांचे सह पोलीस होमगार्ड कर्मचारी लक्ष देऊन असून व्यवस्थापन समितीचे मुतवली मुजावर बाबर अहमद फकीर मोहम्मद सज्जादानशीन साजिद उल्लाह जागीरदार तसेच आर्णी येथील अकबर भाई वसंत कपाटे विजय आमले अब्दुल जब्बार भाई इलियास बावाणी मनोज कीर्तने सय्यद झहीर भाई यांचे सह शहर परिसरातील मान्यवर मंडळी सहकार्य करीत आहे.



# मुदखेड सार्वजनिक क्रीडा संकुलला 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' नाव देण्यात यावे – कुणाल चौदंते

आत्ताच एक्सप्रेस



**मुदखेड –** मुदखेड शहरातील सार्वजनिक क्रीडा संकुल / स्टेडियमला ''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुल, मुदखेड'' असे अधिकृत नामकरण करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात मा. मुख्याधिकारी, नगर परिषद मुदखेड यांना निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मुदखेड हे तालुक्यातील एक प्रमुख शैक्षणिक व क्रीडा केंद्र असून येथे दररोज हजारो तरुण खेळाडू सरावासाठी येतात तसेच विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजनही केले जाते. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला केवळ संविधानच दिले नाही, तर ''शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा'' हा मूलमंत्र देत तरुणांना प्रेरणा दिली. त्यांच्या विचारांमुळे शिस्त, जिद्द आणि संघर्षाची भावना बळकट होत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

मुदखेड येथील क्रीडा संकुलाला डॉ. आंबेडकर यांचे नाव दिल्यास येथील खेळाडूंना व भावी पिढीला प्रेरणा मिळेल व शहरासाठी तो अभिमानाचा विषय ठरेल, असे मत व्यक्त करण्यात आले आहे.

या मागण्यांमध्ये पुढील बाबींचा समावेश आहे सार्वजनिक क्रीडा संकुलाचे अधिकृत नामकरण ''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुल, मुदखेड'' असे करण्यात यावे. नगर परिषदेकडील सर्वसाधारण सभेत नामकरणाचा ठराव मंजूर करण्यात यावा. स्टेडियमच्या मुख्य प्रवेशद्वारावर नामफलक सन्मानपूर्वक लावण्यात यावा. प्रशासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करून त्वरित कार्यवाही करावी, अशी विनंती निवेदनातून कुणाल देविदासराव चौदंते यांच्या वतीने सादर करण्यात आली असून प्रत माहितीसाठी आमदार श्रीजयताई चव्हाण, ८५–भोकर मतदारसंघ यांनाही देण्यात आली आहे.

# किनवट उपविभागात लाईनमन दिवस उत्साहात साजरा

* आत्ताच एक्सप्रेस
लक्ष्मीकांत मुंडे



**किनवट –** किनवट उपविभाग येथे लाईनमन दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दशरथ पवार साहेब यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चिप टेक्निशियन किनवटचे कंधारे साहेब उपस्थित होते.


या कार्यक्रमात सहाय्यक अभियंता अश्विन कुमार मेश्राम (किनवट शहर शाखा), ग्रामीण दोन शाखेचे सहाय्यक अभियंता चव्हाण साहेब तसेच सारखणी शाखेचे अभियंता शेळके साहेब यांनी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

विशेष मार्गदर्शन उपकार्यकारी अभियंता नामदेवरावजी केंद्रे साहेब यांनी करत लाईनमन हे वीज व्यवस्थेचे खरे आधारस्तंभ असून त्यांच्या मेहनतीमुळेच नागरिकांना अखंडित वीजपुरवठा मिळतो, असे सांगितले.

या कार्यक्रमात सर्व लाईनमनचा लाईनमन दिनानिमित्त सत्कार करण्यात आला. तसेच बोधडी येथील अभियंता श्री. क्षीरसागर साहेब यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# नांदेडमध्ये जनतेची लूट खपवून घेतली जाणार नाही–महानगर अध्यक्ष अनिकेत आळंदीकर

* आत्ताच एक्सप्रेस
लक्ष्मीकांत मुंडे



नांदेड – बहुजन समाज पार्टीच्या वतीने अनिकेत आळंदीकर यांची महानगर अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीनंतर त्यांनी नांदेडमधील भ्रष्टाचार, जनतेची लूट आणि शासकीय योजनांमधील गैरप्रकारांविरोधात कडक भूमिका घेतली.

आळंदीकर म्हणाले की, महानगरपालिकेच्या घरकुल योजनेत काही कर्मचारी घरकुल मंजूर करून देण्यासाठी गोरगरिबांकडून लाच घेत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. गरीब आणि गरजू लोकांसाठी असलेल्या योजनांमध्ये जर पैशांची मागणी होत असेल, तर ते अत्यंत गंभीर असून अशा प्रकारांना बहुजन समाज पार्टी कदापि सहन करणार नाही.

तसेच नांदेड शहरात सुरू असलेली नाल्यांची कामे व इतर विकासकामे पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने झाली पाहिजेत. जनतेच्या पैशातून होणाऱ्या कामांमध्ये भ्रष्टाचार किंवा गैरव्यवहार होत असेल, तर त्याविरोधात कठोर भूमिका घेतली जाईल.

याशिवाय राशन दुकानांमधील गैरप्रकार हा देखील गंभीर मुद्दा असल्याचे आळंदीकर यांनी सांगितले. शासनाकडून नागरिकांना किती किलो धान्य मिळणे अपेक्षित आहे, याची माहिती आज ऑनलाईन उपलब्ध आहे. तरीही काही ठिकाणी नागरिकांना कमी राशन देऊन फसवणूक केली जात असल्याच्या तक्रारी येत आहेत. या प्रकारांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि जनतेच्या तक्रारी ऐकण्यासाठी बहुजन समाज पार्टीच्या वतीने विशेष कक्ष स्थापन केला जाणार आहे, असे त्यांनी सांगितले.

पोलीस कर्मचारी असो, शासकीय अधिकारी असो किंवा कोणताही राजकीय नेता असो जर जनतेच्या हक्कांवर डाका टाकण्याचा प्रयत्न केला, तर बहुजन समाज पार्टी त्याविरोधात ठामपणे उभी राहील आणि भ्रष्टाचाराविरुद्ध लढा देईल, असा इशाराही त्यांनी दिला.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाच्या बळावर न्याय, पारदर्शकता आणि जनतेचे हक्क यासाठी लढा देत राहू. नांदेडमध्ये जनतेची लूट होऊ देणार नाही, असा निर्धार महानगर अध्यक्ष अनिकेत आळंदीकर यांनी व्यक्त केला.

प्रमुख उपस्थित :

मराठवाडा प्रभारी झोन मा. मनीषभाऊ कावळे

स्टेट सदस्य मा. चंद्रप्रकाश देगलूरकर

जिल्हा प्रभारी मा. लोकेश कांबळे

जिल्हा प्रभारी मा. लक्ष्मण वायवळे

जिल्हा प्रभारी मा. सटवाजी सोनकांबळे

जिल्हा प्रभारी मा. शिवाजी सोनटक्के

जिल्हा प्रभारी मा. धम्मपाल गच्चे

जिल्हा अध्यक्ष मा. सुभाष भोकरे

जिल्हा महासचिव मा. सुधाकरराव सरोदे

जिल्हा कोषाध्यक्ष मा. सखाराम इगोले

# फसव्या कर्जमुक्तीचा शासनाने फेरविचार करावा–शेतकरी संघटना

* आत्ताच एक्सप्रेस
लक्ष्मीकांत मुंडे

किनवट – आज अर्थसंकल्पीय अधिवेशनात सरकारने घोषित केलेल्या कर्जमुक्ती योजनेने शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. महाराष्ट्रातील शेतकरी आज मोठ्या प्रमाणावर आत्महत्येच्या सावटात महाराष्ट्र आला आहे. शेतकऱ्यांच्या डोक्यावर साडेसात लाख कोटी रुपयांचे कर्ज असताना केवळ वीस हजार कोटी रुपयांची तरतूद करून या शासनाने शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांनी भरलेली संपूर्ण रक्कम व ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान तात्काळ त्यांच्या खात्यात जमा करावे. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतही त्यांनी हे पैसे भरलेत याचा अर्थ शेतकरी हा इमानदार आहे याचे हे प्रतीक आहे.

कोणताही भेद न करता, विना अट संपूर्ण कर्जमुक्ती करून शासनाने दिलेला शब्द पाळावा. शेतकरी कोणताही असो आणि शेतीसाठी घेतलेले कोणत्याही प्रकारचे कर्ज असो ते संपूर्ण माफ झाले पाहिजे. कारण शेती या व्यवसायात सरकारने केलेल्या लुटीचा हा परिणाम आहे.


शेतीमाल स्वस्तात लुटणे आणि कारखानदारी जगवणे या धोरणामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला आहे, हे सरकारचे पाप आहे. शेतकरी तर मोठ्या प्रमाणावर हिंदूच आहेत व स्वतः ला हिंदुत्ववादी म्हणून घेणारं सरकार आहे, मग संपूर्ण कर्जमुक्ती करायला काय अडचण आहे? धर्माच्या आडून शेतकऱ्यांना फसवणे हे आता शक्य होणार नाही. फोडा आणि झोडा नितीचा अवलंब शेतकरी खपवून घेणार नाही.

शेतीचा विकास हे गोंडस कारण लावून शासनाने 'कृषी पायाभूत सुविधा निधी योजना' (एग्रीकल्चरल इन्फ्रास्ट्रक्चर फंड) नावाने योजना निर्माण करून यात लाखो कोटी रुपयाची तरतूद केली असून कोणत्याही सामान्य शेतकऱ्यांना त्या योजनेचा लाभ न देता संबंधित बँका व मोठमोठ्या कंपन्यांनी हा पैसा लाटला आहे. समृद्धी सारख्या योजना कुचकामी आहेत, प्रसंगी अशा योजना थांबवून हा पैसा कर्जमाफीसाठी वळता करावा.

प्रभू रामचंद्रांना मानणाऱ्या सरकारने रघुकुल वचन स्मरावे व निवडणुकीत संपूर्ण कर्जमुक्तीचे दिलेले आश्वासन पाळावे. अन्यथा येणाऱ्या निवडणुकी मध्ये शेतकरी सरकारला जागा दाखवून दिल्याशिवाय राहणार नाही. असे यावेळी झालेल्या पत्रकार परिषदेत शरद जोशी प्रणित शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रमेश कदम पाटील म्हणाले.

# श्रीमद्‌भगवत कथा निमित्त ८ मार्चला बांस पूजन व भव्य शोभायात्रा

आत्ताच एक्सप्रेस



**हिंगोली** – १९ मार्च गुरुवार पासून हिंगोली शहरात श्रीमद भागवत कथेचे आयोजन सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय कथाकार बंधू श्री रमेश भाई ओझा जी यांच्या सुमधुर आवाजात करण्यात आले आहे.* श्रीमद भागवत कथेचे आयोजन स्थल शहरतील रामलीला येथे भव्य मंडप म्हणजेच पंडाल बांधण्यात येत आहे. या मंडपातील स्तंभ रोहन म्हणजेच बांसचे पूजन करण्याचा कार्यक्रम रविवार ८ मार्च रोजी दुपारी आयोजित करण्यात आला आहे.* बांस पूजनासाठी हिंगोली शहरात भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. रविवार ८ मार्च रोजी दुपारी ३:३० वाजता शहरातील पोस्ट ऑफिस रोडवरील श्री बद्रीनाथ मंदिरापासून ध्वज मिरवणूक निघेल. ही मिरवणूक शहरातील गांधी चौक, इंदिरा गांधी चौक मार्गे रामलीला मैदान येथे पोहोचेल. जिथे वैदिक मंत्रोच्चारात स्तंभाची पूजा केली जाईल. त्यामुळे समस्त हिंगोलीवासीयांआव्हान कारण्यात आले आहे की, कथेच्या बांबू पूजनाच्या कार्यक्रमासाठी मिरवणुकीत महिला व पुरुष भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. रविवारी दुपारी साडेतीन वाजता पोस्ट ऑफिस रोडवरील श्री बद्रीनाथ मंदिरापासून ही मिरवणूक निघेल. अशी माहिती मुख्य संयोजक श्री गजराज बाल गणेश मंडळ नि दिली आहे.

# आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त ८ मार्च रोजी 'अस्मिता महिला लीग' स्पर्धांचे आयोजन

आत्ताच एक्सप्रेस

**हिंगोली –** भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाकडून प्राप्त सूचनांनुसार आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'अस्मिता महिला लीग' आयोजनाबाबत मानक कार्यपद्धती निर्गमित करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यात भारतीय क्रीडा प्राधिकरण, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय हिंगोली, खेलो इंडिया, माय भारत, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच तालुका क्रीडा संकुल हिंगोली यांच्या सहकार्याने दि. ८ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता तालुका क्रीडा मैदान, हिंगोली येथे 'अस्मिता महिला लीग' स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

महिला खेळाडूंना स्पर्धात्मक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, क्रीडा सहभाग वाढविणे, स्थानिक स्तरावर क्रीडा चळवळ बळकट करणे तसेच आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिला सक्षमीकरणाचा संदेश देणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे. तसेच जिल्हा स्तरावर क्रीडा संरचना व तांत्रिक क्षमता विकसित करण्यावरही भर देण्यात येणार आहे.

या स्पर्धेत ॲथलेटिक्स प्रकारातील धावण्याच्या स्पर्धांचा समावेश असून १०० मीटर, २०० मीटर व ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. स्पर्धा १३ वर्षाखालील, १३ ते १८ वर्षे व १८ वर्षांवरील मुली व महिलांसाठी खुल्या राहतील.

नोंदणीच्या वेळी खेळाडूंच्या वयाची पडताळणी आधार कार्ड (प्राधान्याने), राज्य किंवा केंद्र शासनाने दिलेला जन्मतारीख नमूद असलेला पुरावा, दहावी उत्तीर्ण प्रमाणपत्र आदी कागदपत्रांच्या आधारे करण्यात येणार आहे. तसेच नोंदणीदरम्यान खेळाडूंचे वय, वजन व उंची नोंदविणे आवश्यक राहील.

हिंगोली जिल्ह्यातील इच्छुक मुली व महिला खेळाडूंनी दि. ७ मार्च २०२६ पर्यंत आवश्यक कागदपत्रांसह https://account.kheloindia.gov.in/#/login या संकेतस्थळावर नोंदणी करणे बंधनकारक आहे. स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्या खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते पदक देऊन गौरविण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी मेरा युवा भारत केंद्र, नाईक नगर, हिंगोली येथे प्रविण पांडे (मो. ७०२८३६९०७१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# श्री क्षेत्र तुळजाभवानी मंदिर विकासकामे भव्य, दिव्य आणि दर्जेदार व्हावीत –पालकमंत्री प्रताप सरनाईक

आत्ताच एक्सप्रेस

**मुंबई –** मराठवाड्याच्या श्रद्धास्थानाचा मुकुटमणी असलेल्या श्री क्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिराच्या विकासकामांना भव्यतेची आणि दिव्यतेची नवी उंची देण्याचा निर्धार व्यक्त करत महाराष्ट्राचे परिवहन मंत्री तथा धाराशिवचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी मंत्रालयात संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेतली.



कोट्यवधी भाविकांच्या अखंड श्रद्धेचे केंद्र असलेल्या या तीर्थक्षेत्राचा विकास केवळ आजचाच नव्हे, तर पुढील शंभर वर्षांचा विचार करून दूरदृष्टीने आणि उत्कृष्ट दर्जाने व्हावा, अशा स्पष्ट सूचना मंत्री सरनाईक यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

बैठकीत तुळजापूर येथील श्री क्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिर विकास आराखड्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. भाविकांच्या सोयी–सुविधा वाढविण्यासाठी हुडको पार्किंग परिसरात उभारण्यात येणाऱ्या भाविक सुविधा केंद्र, आधुनिक भक्तनिवास, व्यावसायिक संकुल, बहुउद्देशीय सभागृह आणि विस्तीर्ण वाहनतळ अशा विविध प्रकल्पांचा समावेश असलेल्या सुमारे ५८२.१७ कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी विकास आराखड्याची माहिती अधिकाऱ्यांनी सादर केली. यासोबतच या कामासाठी आवश्यक असलेल्या भूसंपादन आणि निविदा प्रक्रियेच्या प्रगतीचा देखील आढावा घेण्यात आला.

यावेळी बोलताना मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, श्री क्षेत्र तुळजाभवानी मंदिराचा विकास हा केवळ पायाभूत सुविधांचा प्रकल्प नसून तो महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक अस्मितेशी जोडलेला आहे. त्यामुळे या प्रकल्पात गुणवत्तेत कोणतीही तडजोड होऊ नये, यासाठी प्रशासनाने विशेष दक्षता घ्यावी. अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या निर्मितीचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून तुळजाभवानी मंदिर परिसराचा विकास भव्य, आकर्षक आणि शाश्वत पद्धतीने करावा. देशातील नामांकित विकासक आणि तज्ज्ञ संस्थांचा सहभाग घेऊन या प्रकल्पाला राष्ट्रीय दर्जा प्राप्त करून देण्याचेही निर्देश त्यांनी दिले.

''तुळजाभवानी मातेला दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येतात. त्यामुळे भाविकांना अधिक सुटसुटीत, सुरक्षित आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. योग्य नियोजन, काटेकोर अंमलबजावणी आणि उच्च दर्जाची कामे यामुळेच या तीर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास साध्य होईल,'' असेही मंत्री सरनाईक यांनी नमूद केले.

या बैठकीत धाराशिव जिल्ह्यात सुरू असलेल्या इतर महत्त्वाच्या विकासकामांचाही सखोल आढावा घेण्यात आला. धाराशिव येथे उभारण्यात येणाऱ्या ५०० खाटांच्या आधुनिक जिल्हा रुग्णालयाच्या बांधकामाची प्रगती, धाराशिव व परंडा येथील न्यायालयीन इमारतीचे बांधकाम, तुळजापूर येथील व्हीव्हीआयपी विश्रामगृह तसेच विविध रस्ते विकास प्रकल्पांची स्थिती यावर चर्चा झाली. नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी सर्व प्रकल्प नियोजित वेळेत आणि उच्च दर्जाने पूर्ण करण्याचे निर्देश मंत्री सरनाईक यांनी अधिकाऱ्यांना दिले.

बैठकीस धाराशिव जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. श्रद्धा, विकास आणि सुशासन यांचा सुंदर संगम घडवून श्री क्षेत्र तुळजाभवानी मंदिर परिसराला नवे वैभव प्राप्त करून देण्याचा निर्धार यावेळी मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी–४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०–२४७४८१३ * संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laximi offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813